MHJN100004512024

नि.दि.दा.क्र. ४४/२०२४
रुस्तुम वि. केशव व इतर

## निशाणी क्र.२७ वरील आदेश

अर्जदारांनी सदरचा मयत वादी रुस्तुम केशव खरात यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदारांचे असे कथन आहे की, वादी रुस्तुम केशव खरात हे दिनांक २८/११/२०२५ रोजी मौजे किनखेडा, ता. मंठा, जि. जालना येथे मयत झाले असुन त्यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

२. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, मयत वादीने प्रस्तुतचा दावा हा वादमिळकतींच्या स्वतंत्र ताबा मिळणेकरीता तसेच प्रतिवादींनी नोंदविलेले खरेदीखत त्याच्या हक्कावर बंधनकारक नसल्याने ते अपरिणामकारक म्हणुन घोषीत करणेकरीता व कायम मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यातील मुळ वादी रुस्तुम केशव खरात मयत असून त्यांचे पश्चात त्यांना पत्नी १) लता रुस्तुम खरात, व २) संदीप रुस्तुम खरात, ३) दिपक रुस्तुम खरात व ४) राजरतन रुस्तुम खरात अशी मुले असे वारस असुन ते दाव्यामध्ये सामील करण्याचे आहेत. सदर दाव्यातील वादी हे दिनांक २८.११.२०२५ रोजी मयत झालेले आहे. त्यामुळे मयत वादीच्या नावास कंस करणेत येवुन त्यापुढे मयत वारस असे लिहिण्यास व अर्जदारांना अर्जातील वादी क्र. अ ते ड असे त्यांचे वारस म्हणुन रेकॉर्डवर घेण्यात यावेत.

३.    सदर अर्जावर प्रतिवादी क्र. १, २ व ४ यांनी त्यांनी म्हणणे दाखल करुन अर्जदारांनी सदर अर्जामध्ये त्यांना किती दिवसाचा विलंब झाला आहे याचा कालावधी निश्चीत केलेला नाही.  तरी जास्तीत जास्त खर्च लावुन सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४.    अर्जदार व प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. मयत वादीने सदरचा दावा स्वतंत्र ताबा, खरेदीखत अपरिणामकारक घोषीत करणेकरीता तसेच कायमचा मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे.  अभिलेखावर दाखल वादी यांच्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादी रुस्तुम केशव खरात हे दिनांक २८.११.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे पश्चात अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जदार क्र.अ. लता रुस्तुम खरात, ब. संदीप रुस्तुम खरात, क. दिपक रुस्तुम खरात व ड. राजरतन रुस्तुम खरात असे त्यांचे वारस आहेत. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत वादीचे वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. त्यांना अशी संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना अशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द अर्जदारांना मयत वादीचे वारस म्हणून घेण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्याकरीता त्यांना वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देणे गरजेचे आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

## <u>आदेश</u>

१. सदरचा अर्ज (नि.क्र.२७) मंजूर करण्यात येतो.

२. मयत वादीचे वारस क्र. **अ)** लता रुस्तुम खरात, **ब**) संदीप रुस्तुम खरात, **क**) दिपक रुस्तुम खरात व **ड**) राजरतन रुस्तुम खरात यांना रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येते

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2026.08.04 17:07:10 +0530

स्थळ : मंठा (आर.एम.भेंडे)

दिनांक : ०४.०८.२०२६. दिवाणी न्यायाधीश क.स्तर मंठा